13-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/12/2025 9:42 PM Page 1




एसटी नेतृत्वात मतभेद : भाजपच्या निवडणूक गणितात गोंधळ ? पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



रबाडाची ज्वालाग्राही गोलंदाजी स्मिथचा संयमी प्रतिकार पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, १३ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 281 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 13 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# एअर इंडियाचे प्रवासी विमान कोसळले; २४१ प्रवाशांचा मृत्यू !

## अहमदाबाद मधील नागरी वस्तीत कोसळले विमान : विमानात २४२ प्रवासी : मोठी जिवीतहानी

**अहमदाबाद, दि. १२ :**

**अहमदाबाद शहरातील मेघानीनगर परिसरात एअर इंडियाचे अहमदाबाद-लंडन गॅटविक हे बोईंग ७८७-८ ड्रीमलायनर प्रवासी विमान कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत २४१ हून अधिक जणांचा दुर्दैवी मृत्यू झालाय. गुरुवारी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत २०४ जणांचे मृतदेह हाती लागल्याचे तर ४१ जणांवर रुग्णालयांत उपचार सुर असल्याची माहिती अहमदाबादच्या पोलिस आयुक्तांनी माध्यमांना दिली. या विमानात एकूण २४२ प्रवासी व कर्मचारी होते, त्यामध्ये २३२ प्रवासी आणि १० क्रू सदस्यांचा समावेश होता. मात्र हे विमान नागरी वस्तीत कोसळल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे .**

विमानाने गुरुवारी दुपारी १:३८ वाजता सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केले, मात्र उड्डाणानंतर अवघ्या पाच मिनिटांतच विमानाचा एअर ट्रॅफिक कंट्रोलशी संपर्क तुटला आणि काही क्षणांतच मेघानीनगरमधील निवासी भागात हे विमान कोसळले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या अनेक प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की विमानाचे दोन तुकडे झाले आणि आगीचे लोळ उठले.

शहर पोलीस आयुक्तांनी दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी ६ वाजेपर्यंत २०४ मृतदेह सापडले असून ४१ जखमींवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अग्निशमन दलाच्या १५ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून बचावकार्य सुरू आहे. जखमींना त्वरीत सिव्हिल आणि खासगी रुग्णालयांत दाखल करण्यात आले आहे.



डायरेक्टर जनरल ऑफ सिव्हिल ॲव्हिएशन (डीजीसीए ) फैज किडवाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमानात १६९ भारतीय, ५३ ब्रिटिश, ७ डच आणि १ कॅनडियन नागरिक होते. मुख्य वैमानिक सुमित सभरवाल आणि सहवैमानिक क्लाइव्ह कुंदर होते. विमानात दोन नवजात शिशुंसह एकूण २३० प्रौढ प्रवासी होते.

एअर इंडियाने त्यांच्या एक्स (माजी ट्विटर) अकाउंटवरून या अपघाताची अधिकृत माहिती देत म्हटले की, फ्लाइट क्रमांक ' एआय - १७१ ' , अहमदाबादहून लंडन गॅटविककडे जाणारे विमान, १२ जून रोजी उड्डाणानंतर काही वेळातच अपघातग्रस्त झाले. अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी विमानाने उड्डाणानंतर तात्काळ मे डे' सिग्नल दिला होता. त्यानंतर मात्र विमानाचा संपर्क खंडित झाला.

या दुर्घटनेने संपूर्ण परिसर हादरला. एक प्रत्यक्षदर्शी म्हणाले, मी घरी होतो, अचानक प्रचंड आवाज झाला. क्षणभर भूकंप झाल्यासारखे वाटले. धुराचे लोट आणि आगीचे दृश्य भयंकर होते. नंतर समजले की विमान कोसळले आहे.

भाजप आमदार दर्शना वाघेला यांनी सांगितले की, स्फोटाचा आवाज ऐकून आम्ही घटनास्थळी पोहोचलो. विमान कोसळले होते. डॉक्टरांच्या निवासस्थानाला मोठे नुकसान झाले. स्थानिकांच्या मदतीने आम्ही अनेक डॉक्टरांना बाहेर काढले.

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपस्थित असलेल्या एका नागरिकाने सांगितले की, त्याचा नातेवाईक लंडनला जाणाऱ्या विमानात होता. तर रमिला नावाच्या महिलेने सांगितले की, माझा मुलगा डॉक्टरांच्या हॉस्टेलमध्ये जेवणासाठी गेला होता. अपघातानंतर त्याने दुसऱ्या मजल्यावरून उडी मारली. त्याला जखमा झाल्या पण तो वाचला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर शोक व्यक्त करत म्हटले, ही दुर्घटना अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. या कठीण वेळी मी पीडितांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी उभा आहे. संबंधित मंत्री आणि अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्कात आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देखील ट्विटरवरून शोक व्यक्त करत मदतकार्य तातडीने सुरू ठेवण्याचे आवाहन केले. त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना मदतीसाठी सज्ज राहण्यास सांगितले. प्रियांका गांधी वड्रा यांनीही आपल्या ट्विटमध्ये मृतांच्या कुटुंबीयांना सहवेदना व्यक्त केली.

एअर इंडियाने प्रवाशांच्या नातेवाइकांसाठी १८००-५६९१-४४४ ही हेल्पलाइन सुरु केली आहे.

## निवडक

### ऑनलाइन जुगारात पराभव झाल्याने तरुणाची आत्महत्या

टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. १२ :** ऑनलाइन गेमिंगमध्ये सततच्या पराभवामुळे मानसिक तणावात गेलेल्या १९ वर्षीय तरुणाने केरी येथे आत्महत्या केली. रोहित गावडे (वय १९, ) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रोहितने राहत्या घरी साडीच्या सहाय्याने गळफास लावून आपले जीवन संपवले. १०८ रुग्णवाहिकेच्या कर्मचाऱ्यांनी घटनेची माहिती म्हार्दोळ पोलिसांना दिली.

पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेतली व मृताच्या कुटुंबीयांची चौकशी केली.

प्राथमिक चौकशीत रोहित ऑनलाइन गेमिंगमध्ये व्यस्त होता. त्यासाठी त्याने कुटुंबातील सदस्यांकडून व मित्रांकडून कर्ज घेतले होते. मात्र, जुगारात झालेल्या पराभवानंतर तो नैराश्यात गेला आणि आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले, अशी माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून, मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदन अहवालात फास लागल्यामुळे श्वास गुदमरल्याने मृत्यू झाल्याचे पोलिस सर्जनांनी नमूद केले आहे. त्यानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला.

या घटनेचा पुढील तपास म्हार्दोळ पोलिस ठाण्याचे पीएसआय विभिनव शिरोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## तात्पुरत्या रोजंदारी कामगारांना न्याय कधी ?

टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १२ :** गोव्यातील १३ नगरपालिकांमध्ये गेली अनेक वर्षे तात्पुरत्या रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कामगारांना कायमस्वरूपी कर्मचारी दर्जा द्यावा, या मागणीसाठी गोमंतक मजदूर संघ (जीएमएस) पुढे सरसावला आहे. संघटनेचे अध्यक्षा पुती गावकर यांनी ही माहिती दिली.

**जीएमएसचा १५ जून रोजी साखळीत मेळावा**

गावकर म्हणाले की, गोव्यातील बहुतांश नगरपालिकांमध्ये गेल्या २० वर्षांपासून रोजंदारीवर काम करणारे कामगार उपासमारीच्या स्थितीत आहेत. त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही. १९८८ मध्ये सरकारने नगरपालिका कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे वेतन देण्याची अधिसूचना जारी केली होती, मात्र ती अनेक नगरपालिकांनी आजतागायत अमलात आणलेली नाही.

पान २ ▶

## बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहावर कोसळले विमान

**नवी दिल्ली, दि. १२ :**

अहमदाबाद विमान दुर्घटनेत आणखी एक दुर्दैवी बाब समोर आली आहे. बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहावर एअर इंडियाचे बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर विमान कोसळल्याने पाच वैद्यकीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून ४० हून अधिक विद्यार्थी आणि डॉक्टर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये चार पदवीपूर्व विद्यार्थी आणि एक पदव्युत्तर रहिवासी यांचा समावेश आहे.

**५ विद्यार्थ्यांचा मृत्यू, ४० हून अधिक जखमी**



हे विमान गुरुवारी दुपारी १:३८ वाजता सरदार

पान २ ▶

